## राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये अपील क्रमांक 1340/2007.

श्री.सखाराम पांडूरंग जाधव,
रा.सर्क्यूलर रोड, जिजामाता नगर,
ता.जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**विरूध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा,
कु.मिनाक्षी सरदारसिंग सोनोने
मुख्याध्यापिका,
संत गुलाबबाबा माध्यमिक विद्यालय, वणी,
ता.खामगांव, जि.बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.10.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 19(3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक 31.3.2008 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री.एस. ए.सोनुने, कक्ष अधिकारी हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2006 रोजी संत गुलाबबाबा माध्यमिक विद्यालय, वणी येथील व पृथ्वीराज चौहाण माध्यमिक विद्यालय, निमकव्हळा, ता.खामगांव या दोन विद्यालयाचे संदर्भामध्ये दोन अर्जाचे माध्यमातून 1) कार्यरत कर्मचा–यांची यादी, शैक्षणिक पात्रता, नियुक्ती दिनांक शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा

... 2

कार्यालयाची मालमत्ता प्रत. 2) विद्यार्थ्यांचे दाखल खारीजची झेरॉक्स प्रत, शैक्षणिक सत्र 2000–2001 पासून शैक्षणिक सत्र 2005–06 पर्यंत. 3) रोस्टर प्रमाणित झाल्याची प्रत. (विभागीय आयुक्त, अमरावती यांची). 4) शैक्षणिक सत्र 2000 ते 2001 पासून शैक्षणिक सत्र 2005–06 शिक्षण संच मान्यता कर्मचारी यादीसह व वेळापत्रक. 5) शासकीय अनुदान सन 2000–2001 ते सन 2005–06 पर्यंत दरवर्षी शासनाकडून मिळालेले अनुदानाची प्रत. 6) शैक्षणिक सत्र 2005–06 चे विषयवार वेळापत्रक शिक्षकांचे व एकत्र प्रमाणपत्र. वरील सर्व प्रती साक्षांकित करून देण्यात याव्या. त्यांचा खर्च देण्यास मी तयार आहे असे नमुद करून माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक 17.2.2006 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. त्यानंतर मात्र दिनांक 8.3.2006 रोजी प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक 13.3.2006 रोजी 4.00 वाजता सुनावणी ठेवलेली आहे असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी पत्राने कळविलेले दिसते. त्यानंतर दिनांक 17.3.2006 रोजी अपीलकर्ता यांनी खर्च भरून माहिती उपलब्ध करून दिलेली दिसून येते. सदरच्या पृथ्वीराज चौहान माध्यमिक विद्यालय या शाळेच्या संदर्भातील माहिती रूपये 531/– व संत गुलाबबाबा विद्यालय या शाळेच्या संदर्भातील माहिती रूपये 423/– चा भरणा करून घेवून माहिती उपलब्ध करून दिलेली आहे असे दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात सदरची माहिती ही अपूरी व अतिरिक्त शुल्क घेवून दिलेली आहे असे कारण देवून द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले अपील हे दिनांक 5. 10.2006 रोजी दाखल केलेले असल्यामुळे मुदत बाहय असे दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे ते सकृतदर्शनी फेटाळण्यास पात्र आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम,

2005 चा उद्येश हा माहिती उपलब्ध करून देणे असल्यामुळे तसेच सदरच्या द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये दोन माहिती मागण्याचे अर्ज वेगवेगळया संस्थांना केलेले आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या तरतुदीप्रमाणे कलम 6 प्रमाणे एक अर्ज, कलम 7 प्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यावर प्रथम अपील व प्रथम अपीलाच्या निर्णयाविरूध्द द्वितीय अपील अशी तरतुद आहे. दोन अर्जाचे संदर्भात एकच द्वितीय अपील अशी तरतुद नाही व त्यामुळे सुध्दा सकृतदर्शनी हे एकाच अपीलाचे संदर्भात सुनावणी घेता येवू शकते. परंतु दोनही अर्जाचा विचार करण्यात आलेला आहे.

4. माहितीचा अर्ज दिनांक 13.1.2007 रोजी दाखल केला व माहिती ही दिनांक 17. 3.2006 रोजी देण्यात आली याबद्यल मुख्याध्यापिका यांनी सांगितले की दोनही संस्था हया त्यावेळेस विनाअनुदान तत्वावर होत्या व सदरच्या अधिनियमाचे तरतुदी त्यावेळेस सदरच्या शाळेसाठी लागू नव्हत्या. तशातच संस्था नवीन असल्यामुळे व मुख्याध्यापिका हया नवीन असल्यामुळे कोणत्या प्रकारची माहिती उपलब्ध करून द्यावी वगैरे करिता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना मार्गदर्शन मागितले होते व त्यामुळे माहिती उपलब्ध करून देण्यास विलंब झालेला आहे. मात्र माहिती उपलब्ध करून द्यावयाची नाही किंवा टाळाटाळ करण्यात आलेली आहे असा उद्येश दोनही माहिती अधिका–यांचा नाही असे त्यांनी युक्तीवादात सांगितले. अपूरी माहिती मिळाली याबद्यल अपीलकर्ता यांनी कोणताही खुलासा दिलेला नाही त्यामुळे याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय देता येत नाही. अतिरिक्त फीच्या संदर्भामध्ये फीचे खर्चाचे विवरण पत्राचे अवलोकन केले असता छायांकिंत प्रती व पोस्टेज पेक्षा जास्त खर्च हा घेतला गेला आहे व त्याचे कारण विचारले असता निमकोहळा वरून वरडा या दोन गावापासून बुलढाणा पर्यंत माहिती पोस्टाने देण्याकरिता वाहतुक खर्च वगैरे लावण्यात आलेला आहे. परंतु महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या नियमाप्रमाणे उपलब्ध असलेल्या माहितीच्या

संदर्भात छायांकित प्रती ही प्रती 2/- रूपये प्रत प्रमाणे व पोस्टेज खर्च वेगळा एवढीच फी घेता येते व त्यामुळे अतिरिक्त फीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांची तक्रार ही रास्त वाटते. त्याकरिता अपीलकर्ता यांना उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या प्रतीच्या छायांकित प्रती घेण्याकरिता व व्ही.पी.चा खर्च वगळून अपीलकर्ता यांना बाकी रक्कम परत करणे संयुक्तिक राहील. ती प्रत्येकी 243/- रूपये येते व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी माहितीच्या खर्चाकरिता भरणा केलेल्या रक्कमेतील प्रत्येकी रूपये 243/- हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत परत करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर.

दिनांक 31.3.2008

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

Hirekhan/Goutami-1308/31-3-2008